# थरार : माडू नदी पात्रात झाडाला अडकलेल्या युवकाचे वाचविले प्राण

## मोर्शी आपतकालीन विभागाचे रेस्क्यु ऑपरेशन

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, (दि.4)** - पाय घसरुन माडू नदी पडलेल्या एका युवकाचे आपतकालीन विभागाच्या मित्रांनी रेस्क्यु करुन प्राण वाचविले. मोर्शी तालुक्यातील मायवाडी येथे ही थरारक घटना शुक्रवार(दि.3) संध्याकाळी 7–30 वा.च्या सुमारास घडली. यातील युवक हा नदीपात्रात वाहत जावून एका झाडात अडकून पडला होता.

अमरावती येथील केवल कॉलनी रहिवासी रुपम सिंग सूर्यवंशी (33 वर्ष) हे मायवाडी येथे पाय घसरुन माडू नदीत पडले आणि पाण्याच्या प्रवाहात वाहत गेले. या घटनेची माहिती त्यांच्या सहकाऱ्यांनी मोर्शी तहसील प्रशासनाच्या आपतकालीन पथकाला दिली. माहिती मिळताच रेस्क्यु पथकातील जवान घटनास्थळी बोट, लाईफ बॉय जॅकेट, लाइफ बोय रिंग, रोप व इतर साहित्य घेवून तेथे पोहोचले. रुपम सिंगचा शोध सुरु केल्यावर समजले की, पाय घसरून पडलेला हा युवक नदी मध्ये अंदाजे 300 मीटर अंतरावर एका झाडाला अडकून मृत्यूला झुंज देत आहे. रेस्क्यु पथकाने तातडीने ऑपरेशन राबवून त्याला सुरक्षितपणे बाहेर काढले. ? मोर्शी पोलीस स्टेशनचे पीएसआय अमोल बोरकुल, अंमलदार छत्रपती करपते हेसुध्दा येथे उपस्थित होते.

मदत कार्यात असणाऱ्या आपदा मित्रांमध्ये प्रियांशू तायवाडे, विवेक सावरकर, सागर तायडे,तसेच जीवनसेतू जलमित्र आपत्ती बचाव दलाचे



सदस्य सुरज धुर्वे, सागर काळे यांचा समावेश होता. उपस्थित नागरिकांनी प्रशासन व आपतकालीन पथकाच्या



समयसुचकतेचे कौतूक केले आहे.



# शहर उबाठा शिवसेनेत सर्जरी सुरु?

### काम दाखवा, पदावर टीकून रहा!

### उपनेते नितीन देशमुखांनी दिला निर्वाणीचा इशारा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.4)**- नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीनंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीचे वारे वाहू लागले आहे. विधानसभा निवडणूकीनंतर पक्षातंर्गत वाद आणि पक्षातून झालेली गळती पाहता, आता शहर-जिल्हा शिवसेनेत(उबाठा) सर्जरी सुरु करण्याचे आदेश वरिष्ठ स्तरावरुन पदाधिकाऱ्यांना प्राप्त झाले आहे. त्यामूळे शिवसेना उपनेते नितीन देशमुख यांनी अमरावतीमधील सर्व जबाबदार शिवसेना पदाधिकाऱ्यांना काम दाखवा व पदावर टीकून रहा, असा निर्वाणीचा इशारा दिला आहे.

शनिवारी(दि.4) शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहात या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत महानगरपालिका व जिल्हा परिषद संदर्भात विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी यावेळी शहरातील पक्षाअंतर्गत विविध समस्या उपनेत्यांपुढे मांडल्या. अमरावती शहर शिवसेनेमध्ये मोठ्याप्रमाणात मरगळ आली आहे, त्या संदर्भात देशमुख यांनी शहरात असलेल्या विभाग प्रमुख, शाखाप्रमुख यांना शहरात जेवढे प्रभाग आहेत, त्या प्रभागाची बांधणी ताकदीने करण्याच्या सूचना पदाधिकाऱ्यांना दिल्या. सुत्रांनी माहिती दिली महानगर प्रमुखांची जबाबदारी पराग गुडदे यांच्याकडे आहे, मात्र वास्तवात अमरावती शहरात शिवसेनेच्या शाखा व विभाग प्रमुख हे फक्त आता कागदावरच उरलेले आहे. बैठकीमध्ये उपनेते देशमुखांनी 'काम जर दिसलं तर पदावरुन पायउतार करण्याचा थेट इशारा दिला. संपुर्ण अमरावती शहर व जिल्ह्यातील शिवसेनेची इंतभूत माहिती घेतल्यानंतर देशमुखांनी या बैठकीचे नियोजन केले असल्याची माहिती आहे. यावेळी संपर्क प्रमुख सुधिर सूर्यवंशी, जिल्हा प्रमुख सुनिल खराटे, मनोज कडु, महानगर प्रमुख पराग गुडदे, माजी खासदार अनंत गुढे, माजी नगरसेवक प्रविण हरमकर, अभिजीत ढेपे, माजी नगरसेवक प्रदिप बाजड, डॉ.राजेंद्र तायडे, प्रशांत वानखडे, युवा सेनेचे सागर देशमुख, श्याम धाने, संजय गव्हाळे, सुजीत झंझाळ, नितीन ठाकरे, विजय ठाकरे, नितीर तारेकर यांच्यासह जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणात शिवसैनिक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# तरुणीचे अश्लिल व्हिडीओ वायरल

## आरोपी सोफीयान शेख साजीद ला अटक

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.4)**- अश्लिल व्हिडीओ व लैंगिक अत्याचार प्रकरणातील मुख्य आरोपीला अटक करण्यात चांदुरबाजार पोलिसांना 4 जानेवारी रोजी यश मिळाले. शेख साद ऊर्फ सोफीयान शेख साजीद (19, रा. सर्फाबाद) असे आरोपीचे नाव आहे.

चांदुर बाजार पोलिस ठाण्यात 2 जानेवारी रोजी 19 वर्षीय तरुणीने तक्रार दिली की, ती चांदुर बाजार येथील महाविद्यालयात कला शाखेत पदवी शिक्षण घेत आहे. तिचे माध्यमिक शिक्षणापासुन ओळखीचा असलेला आरोपी शेख साद ऊर्फ सोफीयान शे. साजीद याच्यासोबत प्रेमसंबंध आहे. 9 जुलै रोजी सकाळी 10 वाजता दरम्यान चांदुरबाजार येथे तहसिल कार्यालयासमोर ते दोघेही भेटले असता आरोपीने तरुणीला त्याच्या मित्राच्या चांदुर बाजार येथीलच रुमवर जबरदस्ती नेले. त्यानंतर तेथे तरुणीला शरीरसुखाची मागणी केली, तरुणीने नकार दिला असता आरोपीने तीचे सोबत जबरीने शारिरिक संबंध स्थापित केले. त्यानंतर आरोपीने तरुणीचा अश्लिल व्हीडीओ त्याच्या मित्राच्या मदतीने तयार केला आणि घडलेल्या प्रकाराबाबत आई वडीलांना किंवा इतर कोणालाही सांगितल्यास सदर व्हिडीओ वायरल करून बदनामी करेन. अशी धमकी त्याने तरुणीला दिली. त्यानंतर ते दोघेही आप-आपल्या घरी निघुन गेले. घडलेल्या प्रकाराबाबत तरुणी घाबरली होती, तीने हा प्रकार कोणालाही सांगीतले नाही. परंतू त्यानंतर आठ दिवसानंतर आरोपी शेख साद ऊर्फ सोफीयान हा तरुणीला भेटला व त्याने सांगीतले की, त्याचे दोन अल्पवयीन मित्र यांनी त्याचा मोबाईल घेवुन अश्लिल व्हीडीओ वायरल केले आहेत. त्यामुळे तरुणीने सदर बाब भितीपोटी कोणालाही सांगीतली नाही. त्यानंतर सदर व्हीडीओ तरुणीच्या जवळचे नातेवाईक यांच्या सोशल मिडीयावर आढळुन आले. तेव्हा त्यांनी तरुणीला विश्वासात घेवुन पोलीसांकडे रितसर तक्रार नोदविली आहे. या तक्रारीवरून चांदुर बाजार पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहीता व अनुसुचित जाती जमाती प्रतीबंधक कायद्याचे विविध कलमान्वये आरोपी शे.साद ऊर्फ सोफीयान शे. साजीद व त्याच्या दोन अल्पवयीन मित्राविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला. या गुन्ह्यातील आरोपी शे. साद ऊर्फ सोफीयान शे. साजीद याला पोलिसांनी अटक केली आहे. तसेच गुन्हयाचे तपासात सदर अश्लील व्हीडीओ वायरल करणार्यांची नावे निष्पन्न करुन पुढील कायदेशिर कारवाई करण्यात येत आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलीस अधिक्षक शुभम कुमार करीत आहे.



# प्रशांतनगर चौकातील साहिल लॉन्ड्रीला आग

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 4)**- प्रशांत नगर चौकातील साहिल लॉन्ड्री नामक दुकानाला 4 जानेवारी रोजी रात्री आठच्या सुमारास अचानक भीषण आग लागल्याने खळबळ उडाली. अग्निशमनच्या पाण्याच्या बंबांनी तात्काळ घटनास्थळी पोहोचून आगीवर नियंत्रण मिळविले. परंतु या घटनेमुळे या परिसरात बऱ्याच नागरिकांची गर्दी जमली होती. आगीचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून अग्निशमन विभाग चौकशी करीत आहे. या आगीच लॉन्ड्रीमधील साहित्य जळून खाक झाले आहे.

# नवसारीत महिलेचे मंगळसूत्र हिसकावले

### दोन अज्ञात चोरट्यांविरुध्द गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.4)**- स्टेशनरीचे सामान घेऊन घरी जाणाऱ्या महिलेचे दुचाकीवर आलेल्या दोघांनी 15 ग्रॅमचे मंगळसुत्र हिसकावून नेले. ही घटना गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नवसारी येथील आदिवासी वसतिगृहाजवळ 3 जानेवारी रोजी सायंकाळी 6.30 वाजता घडली. महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी दोन अज्ञात



चोरट्यांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. माहितीनुसार, शहरातील कल्पना नगरातील महिला नवसारी परिसरात स्टेशनरी दुकानातून सामान घेण्यासाठी आली होती. सामानाची खरेदी केल्यानंतर ती महिला हनुमान मंदिरापासून आदिवासी वसतिगृहाजवळ पोहोचली. तेथून कल्पना नगराकडे जात असताना मागून दुचाकीवरून दोन तरुण आले. महिलेजवळ येताच त्यांनी दुचाकीचा वेग कमी केला आणि मागे बसलेल्या तरुणाने महिलेच्या गळ्यातील 90 हजार रुपये किमतीचे 15 ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र हिसकावून भरधाव वेगाने पळ काढला. दरम्यान महिलेला काही समजण्यापूर्वीच आरोपी तेथून पळून गेले होते. घटनेनंतर महिलेने गाडगेनगर पोलिस ठाण्यात याप्रकरणी तक्रार दिली. पोलिसांनी घटनेची नोंद करून घटनास्थळाचा पंचनामा केला. घटनास्थळ आणि मार्गाचे सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम सुरू केले. तक्रारीवरून पोलिसांनी दोन अज्ञात आरोपींविरुद्ध कलम 304 (2) नुसार गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# पत्नीची हत्या करणाऱ्या पतीला 6 पर्यत पीसीआर

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.4)**-पत्नीच्या हत्या प्रकरणातील आरोपीला पतीला न्यायालयाने 6 जानेवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. फ्रेजरपुरा ठाण्याच्या हद्दीतील भोवते लेआऊट परिसरात भाग्यश्री अक्षय लाडे यांची हत्या झाल्याची घटना उघडकीस आली होती. याप्रकरणात पोलिसांनी पती अक्षय लाडेला अटक केली असून, त्याच्या चौकशीत अनैतिक संबंधाची किनार पुढे आली असून, अक्षयने टिव्हीवरील क्राईम पेट्रोल नामक सीरीयल पाहून पत्नीच्या हत्येचा कट रचला आणि पत्नीची हत्या केल्याची माहिती पुढे आली आहे.

# कपाटातून 41 हजार रुपयांचा माल लंपास

**अमरावती** - वरुड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सूर्या कॉलनी येथील एका घरातून चोराने 41 हजार रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले. जया अनिल आगरकर (वय 45) या घराला कुलूप लावून ड्युटीसाठी गेल्या होत्या. दरम्यान, अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश करून कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले, याप्रकरणी जया यांच्या फिर्यादीवरून वरुड पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



# बच्चू कडू, महादेव जानकरांच्या नेतृत्वात 'वाडा आंदोलन' 7 ला

- पोलीस प्रशासन अलर्ट, इतर विभागांचीही झोप मोडली
- मेंढपाळ, शेतकऱ्यांच्या प्रश्नावर शेतकरी नेते आक्रमक



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.4)** - शेतकरी व मेंढपाळांना राज्य शासनाकडून सापत्न वागणूक मिळत असल्याचा आरोप करित बच्चू कडू यांनी शासनाला या दोन्ही घटकांवर विशेष लक्ष देण्याची मागणी निवेदनातून केली होती. परंतू याकडे राज्य शासनाने दुर्लक्ष केले. त्यामूळे याविरोधात येत्या 7 जानेवारी रोजी 'वाडा आंदोलन' करण्याचा निर्णय शेतकरी नेते बच्चू कडू व महादेव जानकर यांनी घेतल्याने पोलीस प्रशासनाने अलर्ट जारी करित बैठका घेणे सुरु केल्या आहे. दुसरीकडे पोलिसांच्या अलर्ट नंतर झोपीत असलेले इतर विभागही जागे झाल्याचे दिसत आहेत.

विधानसभा निवडणूकांनतर देशाच्या अर्थव्यवस्थेचा व ग्रामीण भागाचा कणा असलेल्या शेतकऱ्यासाठी सत्ताधाऱ्यांनी 'गरज सरो वैद्य मरो' ची भूमिका घेतली असल्याचे दिसत आहे.

शेतपिकांना भाव वाढ देण्याऐवजी भाव कमी होत जाताना पहायला मिळत आहे. राज्यातील मेंढपाळ आपल्या न्याय मागणीकरिता सरकारचे उंबरठे झिजवित असताना त्यांच्या मागण्यांच्या संबधात मुख्यमंत्री कुठलेही ठोस पाऊल उचलत नाहीत. दुसरीकडे बियाणे, रासायनिक खते, शेणखताचे भाव वाढत जात आहे. अशी परिस्थिती असताना शेतकऱ्यांनी 12 महिने आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह कसा चालवायचा? असा सवालही कडू यांनी यावेळी सरकारला विचारला. या परिस्थितीमूळे शेतकऱ्यांचे जगणे कठीण झाले आहे, आणि त्यामूळेच शेतकरी आत्मघातकी निर्णय घेवू लागला आहे. हा शेतकरी वाचवायचा असेल तर त्याचे संरक्षण होणे महत्वाचे आहे. या निवेदनाची दखल घेत पोलीस प्रशासनाने सक्रियता दाखवली आणि लगेच सर्व विभागाचे बैठकांचे सत्र सुरू झाले. बैठकीत मेंढपाळ आणि शेतकऱ्यांच्या मुद्यांवर विचारमंथन होत आहे. मात्र मेंढपाळ आणि शेतकरी अद्यापही शासनाच्या खोट्या भूलथापांना बळी पडत आहे.

शासनाने शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचे देखील गाजर दाखवले मात्र कोणत्या शेतकऱ्यांची आणि कोणत्या निकषांवर कर्जमाफी देणार आहेत, हे सरकारने अद्याप स्पष्ट केले नसल्याचा आरोप देखील बच्चू कडू यांनी केला आहे. त्यामुळे मेंढपाळ आणि शेतकऱ्यांच्या मुख्य समस्या शासन दरबारी मांडण्यासाठी बच्चू कडू आणि महादेव जानकर यांच्या नेतृत्वाखाली 7 जानेवारीला 'वाडा आंदोलन' केले जाणार आहे. खबरदारी म्हणून पोलीस प्रशासनाने शनिवारी(दि.4) प्रहार कार्यकर्त्यांसोबत बैठक घेवून काही महत्वाच्या सूचना दिल्या.

# प्रतिकारात्मक यम निघाला वाहनातून!

## रेझिंग डे निमीत्त शहरात हेल्मेट परिधान करून जनजागृती







**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 4)**- रेझिंग डे निमीत्त शहरात हेल्मेट परिधान करून पोलिसांकडून जनजागृती करण्यात आली. 4 जानेवारी रोजी पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी बाईक रॅलीला हिरवी झेंडी दाखवुन पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानातून सुरुवात करण्यात आली.

पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलिस उपायुक्त कल्पना बारवकर, गणेश शिंदे, सागर पाटील यांच्या संकल्पनेतून पोलीस दलाच्या कामकाज, रस्ते सुरक्षा व वाहतुक नियम याबाबत सर्वसामान्य नागरिक व विद्यार्थी याच्यामध्ये जनजागृती करण्याकरिता रेझिंग डे निमीत्त या भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. जनजागृती रॅलीमध्ये प्रतिकात्मक यम याचे वाहन सर्वात समोर राहुन त्याव्दारे वाहन चालवितांना अतिघाई कसे मृत्युला आमंत्रण देते. याबाबत संदेश देण्यात आला. यानंतर वाहतुक विभागाचे अधिकारी व अंमलदार हे हेल्मेट परिधान करुन त्यांचे वाहनांवर रॅलीमध्ये सहभागी झाले होते.

### रस्ता सुरक्षाबाबत पटवून दिले महत्व

पोलीस स्थापना दिना निमीत्य पोलीस विभागाव्दारे आयोजीत बाईक रॅलीचा उद्देश सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी यांना पोलीस विभागाच्या कामकाजाची सखोल माहिती देणे, पोलीस व जनतेतील समन्वय आणखी दृढ करणे तसेच वाहतुक नियमांचे पालन न केल्यामुळे घडणाऱ्या अपघातात होणारी जिवीत हानी, मानसिक त्रास व आर्थिक नुकसान टाळण्याकरीता वाहतुक नियमांचे महत्व तसेच हेल्मेट व सिटबेल्टचा नियमीत वापर आपल्या कसे जिवनदान देवू शकते. याबाबीचे सर्वसामान्य नागरिकांना रस्ते सुरक्षावावत महत्व पटवून देणे हे होते.

### विद्यार्थ्यांसह सामाजिक संघटनांचा पुढाकार

रॅलीमध्ये पोलीस पत्नी व सामाजिक सुरक्षा संस्थेच्या महिला यांनी लालफेटे, महाविदयालय विद्यार्थी यांनी पिवळे फेटे व सर्वसामान्य नागरिक यांनी हिरवे रंगाचे फेटे परिधान करुन सिग्नलचे महत्व पटवुन देत होते. रॅलीमध्ये एन.सी.सी. व आर.एस.पी.च्या विदयार्थ्यांनी सुध्दा उत्सफुर्त सहभाग नोंदविला होता. यामागे पोलीस विभागाचे श्वान पथक, दामिणी पथक, क्यू आर टी स्कॉड, आर सी पी स्कॉड, डायल 112 वाहन, सायबर कॅन, इंटरसेप्टर मोबाईल यांचा समावेश होता. याव्दारे पोलीस दलातील वेगेवेगळया विभागाव्दारे चालणाऱ्या कामकाजाची माहिती सर्व सामान्य जनतेला देणे हा मुख्य हेतू होता. रॅली मध्ये सहभागी व्यक्तींच्या हाती वाहतुक नियमांची जनजागृती संबंधाने वेगवेगळी घोषवाक्य फलकाव्दारे संदेश देण्यात आला.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# दूषित पाण्यामुळे नऊ जणांना अतिसाराची लागण

## पिंपळखुटा येथील प्रकार



**महासागर प्रतिनिधी**
**धामणगाव रेल्वे,( दि.4 )**- तालुक्यातील पिंपळखुटा येथे विहिरीतून दूषित पाण्याचा पुरवठा झाल्याने गावातील एका बालकासह अन्य आठ जणांना अतिसाराची लागण झाली. त्यामुळे आरोग्य विभागाने तातडीने रुग्णांवर औषधोपचार सुरू केला. पाण्याचे नमुने तपासणीकरिता प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहे. त्यामुळे सदर विहिरीचा पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे.

आरोग्य विभागाने वेळीच दखल घेऊन पिंपळखुटा येथे आरोग्य शिबिर घेऊन परिस्थिती आटोक्यात आणली आहे. तालुक्यातील पिंपळखुटा येथे एका विहिरीच्या दूषित पाण्याच्या पुरवठ्यामुळे अतिसाराचे नऊ रुग्ण गुरुवारी रात्रीला आढळून आले होते. यामध्ये 14 वर्षीय मुलासह 8 प्रौढ व्यक्तिचा समावेश आहे. त्यांना जुलाब, उलटी, पोटदुखी होत होती. त्यांच्यावर अंजनसिंगी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात तपासणी करण्यात आली व औषधोपचार करुण सुटी देण्यात आली असल्याचे आरोग्य प्रशासनाकडून सांगण्यात आले. सदर विहिरीच्या पाण्याचे नमुने घेऊन तपासणीकरिता प्रयोगशाळेत पाठविले असल्याची माहिती मिळाली आहे. तसेच या विहिरीचा पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे. दरम्यान, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. हर्षल क्षीरसागर, डॉ. मेघा वानखडे, डॉ. धीरज देशमुख, विवेक सुदेवाल, चंदणे, मीना चव्हाण यांनी गावाला भेट दिली. सध्या पिंपळखुटा येथे 24 तास रुग्णालयाची सेवा उपलब्ध करुण देण्यात आली आहे. संपूर्ण गावात आरोग्य तपासणी करण्यात येत आहे. आरोग्याची काळजी घेण्याचा सल्लाही देण्यात आला. पाणी गाळून व उकळून प्यावे, काही त्रास झाल्यास लवकरात लवकर आरोग्य विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. हर्षल क्षीरसागर, तसेच गटविकास अधिकारी संजय पाटील यांनी केले आहे.

# जन्म, मृत्यूच्या दाखल्यासाठी पहावी लागते मरणाची वाट!

## महापालिकेच्या भोंगळ कारभाराविरोधात करणार आंदोलन

### शिवसेनेचे प्रविण हरमकर आक्रमक



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.4 )**- आजच्या अत्याधुनिक काळात एका क्लिकवर सर्वकाही, अत्यंत कमी कालावधीमध्ये नागरिकांना प्राप्त होत असताना, जन्म-मृत्यूच्या दाखल्यासाठी अमरावती महापालिकेत मात्र मरणाची वाट पहावी लागत आहे.

जन्म-मृत्यूचा दाखला सर्वच कागदपत्रांमध्ये अत्यंत महत्वाचे दस्तावेज समजले जाते. विद्यार्थ्यांना शाळेकरिता, वृध्दांना पेन्शन करिता, आजारपणा करिता, शासकीय कामाकरिता, प्रॉपर्टी हस्तांतरण, लाडकी बहिण योजनेकरिता या दस्तावेजाची काम पडते. शाळेतील प्रवेश प्रक्रीयेपासून तर जात पडताळणी प्रमाणपत्रापर्यंत या दाखल्याचे काम पडते. या दाखल्याचे सर्वाधित परदेशात जाण्याऱ्या व्यक्तींसाठी कागदपत्रे तयार करताना काम पडते. मात्र नागरिकांना या लहानश्या कागदासाठी महापालिका कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत आहे.

कधी शहरातील झोन कार्यालय, तर कधी महापालिका कार्यालय असे खेटे नागरिकांना घ्यावे लागत आहे. जी व्यक्ती ज्या झोन मध्ये राहते आहे, त्याच झोन कार्यालयात दाखला मिळतो, मात्र दाखला सिस्टीम ऑनलाइन असल्यामुळे तो जन्म-मृत्यूचा दाखला कोणत्याही झोनला मिळायला पाहिजे. जेणेकरून लोकांना त्रास होणार नाही. दोन ते तिन महीने लोकांना कार्यालयाचे उंबरठे झिजवायची गरज भासणार नाही. या आधी मनपा मध्ये हेच दाखले एक ना दोन दिवसात, कधी कधी तर अगदी त्याच दिवशी हातोहात मिळायचे. परंतु आता आपण जी पद्धती वापरून हे काम सुरू केले आहे. ही पद्धती फार चुकीची आहे.

महापालिका प्रशासनाने लोकांच्या हिताची कामे लवकर व्हावी याकरिता सज्ज असावे, याउलट आपण मनपा ही पद्धती लोकांना त्रासदायक केली आहे. या पध्दतीमध्ये तातडीने सुधारणाबाबत अवघ्या चार दिवसात निर्णय न घेतल्यास कोणत्याही क्षणी उग्र आंदोलन छेडण्याचा इशारा शिवसेनेचे माजी नगरसेवक प्रविण हरमकर यांनी आपल्या निवेदनातून दिला आहे. निवेदन देताना गोविंद दायमा, आनंद राठी, रमेश गुरमाळे, मनिष रामावत, प्रमोद वानखडे,निकेश शर्मा,अजीम खान, कमलेश गुप्ता आदी उपस्थित होते.



## दुचाकी अपघातात तरुणाचा मृत्यू

**अमरावती.** धारणी पोलीस ठाणे हद्दीतील कंजोली येथील राजेश प्यारसिंग बावणे (30) व अनिल बिसराम भिलवेकर हे दोघे दुचाकीवरून राणीगाव आश्रमशाळेजवळ जात होते. दरम्यान एमएच 27/सीई 6810 क्रमांकाच्या दुचाकी चालकाने भरधाव वेगात व वाहन चालवत राजेश बावणे यांच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात अनिल भिलवेकर यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. राजेशच्या फिर्यादीवरून धारणी पोलिसांनी चालकावर गुन्हा दाखल केला आहे.

# विद्यार्थ्यांनी संकल्प, श्रद्धा आणि समर्पण वर लक्ष केंद्रित केले पाहिजे-डॉ.पाटणकर




**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.4 )** - विद्यार्थ्यांनी करियर निवडताना संकल्प, श्रद्धा आणि समर्पण या तीन गोष्टींवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. तसेच संवाद कला, निर्णय क्षमता आत्मसात केल्या पाहिजे, असे शैक्षणिक सल्लागार व समुपदेशक डॉ. क्षितिज पाटणकर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले. ते शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या 126 व्या जयंती उत्सव प्रित्यर्थ मोर्शीच्या शिवाजी उच्च माध्यमिक शाळा येथे 21 व्या शतकातील आधुनिक करिअर्स या विषयावर बोलत होते. ते पुढे होणारे की साधारण दशकापूर्वी परिस्थिती वेगळी होती, संधी कमी असल्या तरी पात्र असणा-यांची संख्याही जेमतेमच असायची. मग कोणी डॉक्टर, इंजिनिअर, वकील किंवा सरकारी नोकरी पत्करणे असे पर्याय निवडून अगदी यशस्वी आयुष्य जगू शकत असे. पण 'पारंपरिक प्रसिद्ध' पर्यायांशिवाय अनेक उत्तम करियर पर्याय सध्या उपलब्ध आहेत.

याप्रसंगी भारतीय महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. संदीप राऊत यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शाळेचे उपमुख्याध्यापक रवींद्र जावरकर यांचे अध्यक्षतेत झालेल्या या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख, शाळेचे पर्यवेक्षक उद्धव गीद, सेवानिवृत्त तहसीलदार किशोर गावंडे, मोर्शीच्या भारतीय महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. संदीप राऊत, अंबादास सिनकर, गजानन ढोंगे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाला शाळेतील बहुसंख्य विद्यार्थी आणि सर्व शिक्षक, शिक्षिका उपस्थित होते.



## ॲड.राजेश लव्हाळे व अयाजोद्दिन रियाजोद्दिन यांची सरकारी अभियोक्ता पदी निवड

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी, ( दि.4 )**- अंजनगाव सूर्जी येथील न्यायालयात गेल्या 12 वर्षापासून वकीली म्हणून सेवा देणारे ॲड.राजेश लव्हाळे व ॲड.अयाजोद्दिन रियाजोद्दिन यांची सरकारी अभियोक्ता पदी राज्यशासनातर्फे नियूक्ती करण्यात आली आहे.

या निवडीनंतर दि. 4 जानेवारी रोजी अंजनगाव सुर्जी वकिल संघातर्फे दोघांचाही सत्कार करण्यात आला. ॲड.राजेश लव्हाळे यांची नियुक्ती यवतमाळ येथील न्यायालयात तर ॲड.अयाजोद्दिन रियाजोद्दिन धाराशीव येथील कळंब येथे नियूक्ती झाली आहे. त्यांच्या नियुक्तीबद्दल अंजनगाव वकील संघ व शहरातील नागरीकांतर्फे शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त वृक्षारोपण



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.4 )**- स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या माता सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून येथील अनुराधा कॉलनी शेगांव रहाटगांव परिसरातील मानवता विकास बहुद्देशीय संस्थेमार्फत वंचित बहुजन युवा आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्ष रिना प्रशांत गजभिये यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. समस्त महिला संघाने सर्वानुमते रिना गजभिये यांना सदर उपक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून पाचारण करून त्यांच्या पुढाकारातच परिसरात ठिकठिकाणी वृक्षारोपण केले,या कार्यक्रमादरम्यान वंदना कोकाटे, सुलभा अडकणे, जया इंगोले, छाया मेश्राम, चंदा मेश्राम, विमल मोहोड, कल्पना वानखडे, सुनंदा वानखडे, प्रतिभा भालेराव, छाया चक्रे, इंगळे, जागृती मेश्राम, राणी मेश्राम, अंकिता इंगोले, बबीता नाईक, शालु तायडे, प्रतिभा बांगरे, उज्वला धुळे व नंदा वानखडेंसह इतर महिलाही उपस्थित होत्या.

# पाणी पुरवठ्यातील अडथळे दूर करून जलापूर्तीचे नियोजन करा -आ.सुलभा खोडके

## अमृत -2 पाणी पुरवठा व भुयारी गटार योजनेच्या कामांचा आढावा



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.4 )**- शहराला अप्पर वर्धा धरणातून पाणी पुरवठा करण्यात येतो. धरणात भरमसाठ पाणी साठा असतांना मात्र शहरवासीयांना अपुऱ्या व अर्थवट पाणी पुरवठ्याची झळ सहन करावी लागते. आगामी उन्हाळ्यात संभाव्य पाणी टंचाई लक्षात घेता पाणी पुरवठ्याच्या विविध योजनांची कामे तसेच पाणी पुरवठ्याच्या सुक्ष्म नियोजन करणे महत्वाचे आहे. त्यामुळे पाणी पुरवठ्यातील अडथळे दूर करून शहरवासीयांना सुरळीत व मुबलक जलपूर्तीचे नियोजन करण्याच्या सूचना अमरावतीच्या आमदार सुलभा संजय खोडके यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या.

3 जानेवारी रोजी आ.सुलभा खोडके यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सभागृहात केंद्र पुरस्कृत अमृत टप्पा-1 अभियान अंतर्गत पाणी पुरवठा योजना तसेच अमृत -2 अमरावती वाढीव पाणी पुरवठा अंतर्गत प्रस्तावित कामांचा आढावा घेतला. शहरात अमृत-अभियान 1 अंतर्गत 500 किलोमीटरची पाईप लाईन टाकण्यात आली असून 61 दशलक्ष लिटर क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र तपोवन परिसरात उभारण्यात आले आहे. अस्तित्वातील जलशुद्धीकरण केंद्राची दुरुस्ती करण्यात आली असून शुद्ध पाण्याची ऊर्ध्ववाहिनीची देखील दुरुस्ती करण्यात आली आहे. तसेच 11 जलकुंभ बांधण्यात आले असून 100 टक्के काम पूर्ण करून कार्यान्वित करण्यात आले आहे. सिंभोरा येथे विद्युत पुरवठा खंडित होण्याच्या कारणाने पाणी पुरवठ्यात अडचणी उद्भवत असल्याने आता त्या ठिकाणी 33 केव्ही विद्युत पुरवठा युनिट उभे करण्यात आले आहे. अशी माहिती मजीप्रा प्रशासनाच्या वतीने देण्यात आली. यावेळी आमदार यांनी सर्व तांत्रिक बाबी तपासून तसेच काही प्रमाणात ट्रायल घेऊन अस्तित्वातील पाईप लाईनमधील अडथळे लक्षात घेता व आवश्यक उपाययोजना करण्याबाबत संबंधितांना सूचना केल्यात. आगामी उन्हाळ्यात अमरावतीकरांना पाणी पुरवठ्याची उपलब्धीला घेऊन झळ पोहोचू नये, यासाठी सर्व अधिकाऱ्यांनी योजनेच्या कामांची परिस्थिती व उपाययोजनांना घेऊन विशेष ड्राइव्ह घेऊन सूक्ष्म निरीक्षण करण्याच्या सूचना सुद्धा आमदार महोदयांच्या वतीने देण्यात आल्या. या बैठकीला आ.सुलभा खोडके यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष संजय खोडके, यश खोडके, मजीप्राचे कार्यकारी अभियंता - विवेक सोळंके, उपविभागीय अभियंता संजय लेवरकर, शाखा अभियंता शिवहरी कुलट, मनोज वाकेकर , उपकार्यकारी अभियंता अतुल काटे , शाखा अभियंता मोरेश्वर आजने, सहायक अभियंता गुरुदत्त अविनाशे, सहायक अधीक्षक अभियंता सायकुंडे, स्नेहल राऊत, आदींसह मजीप्राचे अभियंता तसेच सर्व सहकारी उपस्थित होते.

### शहर भुयारी गटार योजनेच्या कामांवर मंथन

अमृत टप्पा-1 मध्ये महापालिकेचा स्वनिधी प्राप्त न झाल्याने ही योजना बारगळली आहे. मागील अमृत टप्पा-1 अंतर्गत रखडलेल्या अमरावती शहर भुयारी गटार योजनेची कामे आता केंद्र पुरस्कृत अमृत टप्पा-2 च्या 1718 कोटींच्या सुधारित कृती आराखडामध्ये समाविष्ठ करून तसा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे. तसेच ज्याप्रमाणे अमृत-2 अमरावती वाढीव पाणी पुरवठा मंजूर करून आणली. आगामी काळात अमृत टप्पा -2 अमरावती भुयारी गटार योजनेच्या 1718 कोटींच्या प्रस्ताव शासनाकडून मंजूर करून आणण्यासाठी आपण पुढाकार घेणार असल्याचे आमदार यांनी बैठकीत सांगितले.

# प्रो. राम मेघे च्या चमूची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.4 )** - संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठद्वारे घेण्यात आलेल्या संशोधन अविष्कार 2024 - 2025 मध्ये प्रो. राम मेघे इंस्टिट्यूट ऑफ टेकनॉलॉजि अँड रिसर्च, बडनेरा च्या पाच संशोधकाची डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेकनॉलॉजिकल युनिव्हर्सिटी, लोणेरे, जिला रायगड, होणाऱ्या आंतरविद्यापीठ संशोधन अविष्कार-2025 साठी निवड करण्यात आली.

प्रो.राम मेघे इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, बडनेरा या महाविद्यालयातून कल्पेश देशमुख( पीपीजी-ऐऐयच ), विवेक टोंगे (पीपीजी-इटि), वैभव धावले( पीपीजी-पीएस), यश सुधीर लवनकर( युजी-पीएस) तसेच प्रभव रवींद्र कळगे (युजी-सीएमएल) या श्रेणी मध्ये जवळपास 250 जिल्हास्तरीय स्पर्धकांमध्ये व 250 विद्यापीठस्तरावर स्पर्धकांमध्ये निवड करण्यात आली. या सर्व विद्यार्थी संशोधकांना विद्यापीठ द्वारे कलरकोट प्रदान करण्यात आले. या स्पर्धेसाठी यशस्वी नियोजना करीता महाविद्यातील डॉ. नितीन कटारिया, डॉ. पियुष कोल्हे, डॉ. प्रतीक देशमुख आणि डॉ. कापडिया यांनी अगोदर महाविद्यालय स्तरावर स्पर्धा नंतर विद्यपीठा सोबत समन्वय केले.या स्पर्धेसाठी महाविध्यालायाचे प्राचार्य डॉ. गजेंद्र बमनोटे, रिसर्च आणि डेव्हलपमेंट विभागाचे प्रमुख डॉ. समीर देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीनजी धांडे, उपाध्यक्ष ॲ्ड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष डॉ. हेमंतजी देशमुख, सचिव युवराजसिंगज चौधरी, सन्माननीय सदस्य नितीन हिवसे, डॉ.पूनम चौधरी, पंकज देशमुख, प्रो. विनय गोहाड, गजानन काळे यांनी विजेताचे कौतुक करून पुढील स्पर्धेसाठी सर्व विद्यार्थी संशोधकांना शुभेच्छा दिल्या.


## जाहीरनोटीस

या जाहीर नोटीस द्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार साबीर खान नसरउल्ला खान रा. अंजनगांव ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथील रहीवाशी आहेत. त्यांच्या स्वताचा जन्माची नोंद नगरपरिषद अंजनगांव येथे रजिस्टरमध्ये जन्माची नोंद नसल्याने त्यांनी जन्म/मृत्यू अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये जन्माच्या नोंदीचे आदेश होण्याबाबतचा विनंती अर्ज या कार्यालयात दि. २६.०८.२०२४ रोजी सादर केला आहे.

त्यामुळे अर्जदारांनी दिलेल्या अर्जावरून जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात येत आहे साबीरखान नसरउल्ला खान यांचा जन्म अंजनगांव येथे ६-५-१९६६ रोजी झाला आहे. त्याबाबत कोणाची हरकत किंवा आक्षेप अथवा तक्रार असल्यास किंवा प्रकरणात काही म्हणावयाचे असल्यास त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत स्वत: अथवा आपल्या अधिवक्ता मार्फत लेखी म्हणने सादर करावेत अन्यथा ३० दिवसानंतर जर कोणाची हरकत किंवा आक्षेप अथवा तक्रार प्राप्त झाल्यास त्याचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

कोर्ट शिक्का

( रविंद्र काळे )
निवासी नायब तहसीलदार
अंजनगांव सुर्जी

## जाहीरनोटीस

या जाहीर नोटीस द्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार साबीर खान नसरउल्ला खान रा. अंजनगांव ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथील रहीवाशी आहेत. त्यांच्या मुलगा जन्माची नोंद नगरपरिषद अंजनगांव येथे रजिस्टरमध्ये जन्माची नोंद नसल्याने त्यांनी जन्म/मृत्यू अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये जन्माच्या नोंदीचे आदेश होण्याबाबतचा विनंती अर्ज या कार्यालयात दि. २६.०८.२०२४ रोजी सादर केला आहे.

त्यामुळे अर्जदारांनी दिलेल्या अर्जावरून जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात येत आहे जाहीद खां साबिर खा यांचा जन्म अंजनगांव येथे ३-४-१९९३ रोजी झाला आहे. त्याबाबत कोणाची हरकत किंवा आक्षेप अथवा तक्रार असल्यास किंवा प्रकरणात काही म्हणावयाचे असल्यास त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत स्वत: अथवा आपल्या अधिवक्ता मार्फत लेखी म्हणने सादर करावेत अन्यथा ३० दिवसानंतर जर कोणाची हरकत किंवा आक्षेप अथवा तक्रार प्राप्त झाल्यास त्याचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

कोर्ट शिक्का

( रविंद्र काळे )
निवासी नायब तहसीलदार
अंजनगांव सुर्जी